स्वच्छ भारत अभियान 2022




स्वच्छ भारत अभियानातंर्गत अश्विन ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालयाने 10 जुन ते 31 जूलै 2022 या दरम्यान वेगवेगळे उपक्रम सादर करुन राबविला. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, उपप्राचार्य व शिक्षकेत्तर कर्मचारी  या सर्वांनी सहभागी होवुन पर्यावरणाचे रक्षण करण्यास मदत केली.

या कार्यक्रमाअंतर्गत विद्यालयात व्याख्यान ठेवण्यात आले होते. मा. प्रसाद खालतकर हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.



मा. खालतकर सरांनी विद्यार्थ्यांनर स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी ''माहिती दुत ॲप'' बद्दल देखील माहिती सांगितली. तसेच या ॲप्लिकेशन व्दारे गरजु विद्यार्थ्यांची तसेच गरजु लोकांची कशी मदत करता येवु शकते याबद्दल मार्गदर्शन केले. मा. सरांच्या भाषणाने प्रेरीत होवुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ते ॲप्लीकेशन ओपन करुन त्यात सहभाग नोंदविला.



या अंतर्गत राबविण्यात आलेले कार्यक्रम

1. वृक्षारोपण
2. स्वच्छता अभियान
3. कचऱ्याची विल्हेवाट
4. जनजागृती

1. **वृक्षारोपण :–**

   आमच्या महाविद्यालयात वृक्षारोपण हा कार्यक्रम मोठया उत्सहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख नेतृत्व मा. डॉ. राहूल बनारसे यांनी केले. यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात विविध आयुर्वेदिक वनस्पतींचे रोपण केले.







हा कार्यक्रम महाविद्यालयात दि. 10 जुन 2022 ते 20 जुन 2022 या कालावधीत राबविण्यात आला.

2. **स्वच्छता अभियान :–**

वृक्षारोपणानंतर महाविद्यालयाने स्वच्छता अभियान राबविले. यात प्रमुख नेतृत्व मा. डॉ. चंद्रकांत शिंदे यांनी केले. सरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर तसेच महाविद्यालयातील हॉस्पिटल व परिसर स्वच्छ केला.



त्याच बरोबर आश्वी, मांचीहिल इत्यादी जवळपासच्या परिसरात जावून गावांची स्वच्छता केली, तसेच ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवुन दिले.





हा कार्यक्रम महाविद्यालयाने दि. 21 जून ते 23 जुन या कालावधीत राबविला.

3. **कच–याची विल्हेवाट :**

स्वच्छता अभियानानंतर निघालेल्या कच–याची विल्हेवाट कशी लावावी या बाबतीत मा डॉ. उमेश काळे यांनी नेतृत्व केले. सरांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी परिसरातील तसेच गावातील कचरा गोळा करुन योग्य प्रकारे विल्हेवाट लावली.



तसेच ग्रामस्थांना ओला कचरा व सुका कचरा याबद्दल मार्गदर्शन केले. ओला कचरा व सुका कचरा वेगळा करुन पुर्ननिर्मितीसाठी त्याचा कसा वापर करावा याचे ही मार्गदर्शन केले.



प्लास्टिकमुळे होणारे उपाय ग्रामस्थांना समजुन सांगितले व त्याप्रमाणे प्लास्टिकची विल्हेवाट विद्यार्थ्यांनी लावली. हा कार्यक्रम महाविद्यालयात दि. 24 जुन ते 27 जुन या कालावधीत राबविण्यात आला.

4. जनजागृती :—

महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी आसपासच्या परिसरातील गावामध्ये जावुन प्रभात फेरी काढली. व गावातील लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले.





या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. संजीव लोखंडे व उपप्राचार्य मा. डॉ. शिवपाल खंडीझोड यांनी व्याख्यान दिले. व्याख्यानातुन ग्रामस्थांना अस्वस्थतेमुळे तसेच अस्वच्छतेमुळे होणारा पर्यावरणाचा –हास समजुन सांगितला. हा कार्यक्रम वेगवेगळया गावांत जावुन राबविण्यात आला.

महाविद्यालयात हा कार्यक्रम दि. 28 जुन ते दि. 31 जुन या दरम्यान राबण्यिात आला.

अशा प्रकारे '' स्वच्छ भारत समर इन्टर्नशिप कार्यक्रमाअंतर्गत '' महाविद्यालयाने विविध कार्यक्रम राबवुन कार्यक्रमाची सांगता केली.

Ashvin Rural Ayurved College • Manchi Hill, Ashvi Bk • Tal Sangamner Dist A.Nagar

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk. Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar